एमा लज़ारसची कहाणी

स्वातंत्र्याची वाणी


मराठी : अश्विनी बर्वे



एमा लज़ारसची कहाणी


स्वातंत्र्याची वाणी





एमा लज़ारसला शिकायला आवडत होते. तिच्या ज्ञान संपादन करण्याची भूक होती आणि शिकण्याची उत्कट इच्छा. याच उत्कट इच्छेमुळे एक दिवस ती स्वातंत्र्याचा आवाज झाली.

पण १८४९ मध्ये, जेव्हा एमाचा जन्म झाला, तेव्हा लोकांचा विश्वास होता की स्त्रियांनी शिकणे ही सन्मानीय गोष्ट नाही आणि जी मुलगी आपल्या डोक्याचा अधिक उपयोग करत असे, ती आजारी पडत असे. सुदैवाने एमाचे वडील असा विचार करत नसत. ते साखरेचे एक संपन्न उत्पादक होते. एमा आणि तिच्या भाऊ-बहिणीना शिकवण्यासाठी ते शिक्षकांना घरी बोलावत असत.




एमा न्यूयॉर्कच्या रहदारी असलेल्या यूनियन स्क्वायरमध्ये मोठी झाली. यामुळे तिला पुस्तकांच्या शिवाय आपल्या आसपासच्या जगातून खूप काही शिकण्याची संधी मिळाली.

जशी ती मोठी झाली, कविता तिला सगळ्यात जास्त आवडू लागल्या. तिला वाटे की कवी शब्दांना नवीन अर्थ देतात. ती विचार करे, तिला अशा प्रकारच्या कविता कशी लिहायला शिकू शकेल?

एक दिवस जेव्हा ती लोकप्रिय लेखक राल्फ वाल्डो एमर्सनचे पुस्तक वाचत होती, तिने काही असे शब्द वाचले की ते तिच्या मनाला स्पर्शून गेले. शब्द सांगत होते की, “आपल्या अंतर्मनाचा आवाज ऐकत ....”

तिने आपल्या अतर्मनचा आवाज ऐकला ... आणि कुठून तरी आतून शब्द आले, आकृती तयार होऊ लागल्या.

एमा लिहू लागली.



एमाला प्रत्येक ठिकाणाहून लिहण्याची प्रेरणा मिळाली. कविता लिहून-लिहून तिची एक वही भरल्यानंतर दुसरी वही ही भरली. आपल्या मित्राच्या मृत्यूनंतर आपल्या दुःखाच्या बाबत तिने लिहले. सिविल वॉरच्या एका जनरलच्या वीरतेवर लिहलं. आणि सुंदर यूनानी देवी एफ्रोडाइटचे समुद्रात प्रकट होण्याविषयी लिहले.

जिथं कुठे ती जात असे तिथं ती आपली वही घेऊन जाई. न्यूपोर्ट मध्ये असलेल्या कुटुंबाच्या उन्हाळी घरी सुद्‌धा ती वही घेऊन गेली.

जेव्हा तिचा भाऊ आणि पाच बहिणी धावत आणि खेळण्यात व्यग्र असत तेव्हा ती कविता लिही आणि त्या दुरुस्त करत असे.





जेव्हा ती शंभर वर्षापूर्वीच्या जुन्या सिनेगॉगमध्ये गेली, जे स्पेन आणि पोर्तुगालच्या त्या यहुदींनी बांधले होते. जे सुरक्षेसाठी आणि स्वातंत्र्यासाठी अमेरिकेत आले होते. ती आपली वही बरोबर घेऊन गेली. आपल्या धर्माचा विश्वासघात करण्याऐवजी, त्या लोकांनी आपले घरदार सोडले होते. कुठं जायचं आणि जिवंत कसं राहायचं आहे माहित नसतांना. त्या लोकांपैकी एक एमाचे पूर्वज होते.

त्या पुरातन प्रार्थना-स्थळात कमी प्रकाशाच्या जागेवर उभं राहून, एमा कल्पना करू लागली की त्या लोकांनी काय अनुभव घेतला असेळ. तिने आपला आतला आवाज, एक कुजबुज ऐकली. शब्द जन्म घेऊ लागले, आकार दिसू लागले.

या मंदिरात किती जणांनी प्रार्थना केल्या.

त्या उदास हृदयातून जे सुखापासून होते वंचित

ते जे झाले निर्वासित शतका पूर्वी

त्या सुंदर धरतीहून जी त्यांची होती जन्मभूमी!





एमाची वही कवितांनी भरली होती. पण काय त्या चांगल्या कविता होत्या? संकोच करत तिने आपल्या वडिलांना वही दाखवली.


मोसेस लज़ारस प्रसन्न झाले – त्यांच्या मुलीत योग्यता होती. तिला प्रोत्साहित करण्यासाठी वडिलांनी एका पुस्तकात तिच्या काही कविता छापून आणल्या. त्या पुस्तकाचे नाव होते “कविता आणि अनुवाद” चौदा आणि सतरा वर्षाच्या वयात एमा लज़ारस द्वारे लिहलेले. हे पुस्तक त्यांनी त्यांच्या मित्रांमध्ये आणि सबंधितांना वाटले.

परिवारला या गोष्टीचा गर्व होता की त्यांची एमा एक कवी होती.

एका प्रकाशनाचे संपादक याबाबत सहमत होते. पुढच्या वर्षी त्या प्रकाशकाने सर्व लोकांसाठी त्या पुस्तकाचे प्रकाशन केले. एमाच्या लेखणीतून कविता बाहेर येऊ लागल्या.







हिवाळ्यातील एका संध्याकाळी, एमा आईवडीलंबरोबर जेवणासाठी बाहेर गेली. तिथं तिचे वडील जेवणासाठी आलेल्या पांढऱ्या केसांच्या एका व्यक्तीकडे गेले आणि त्यांच्याशी परिचय करून दिला. “एमा, हे आहेत मिस्टर राल्फ वाल्डो एमर्सन.”

प्रसिद्ध लेखक ज्यांच्या पुस्तकातूनच तिने आपल्या अंतर्मनाचा आवाज ऐकण्याचे ती शिकली होती. तिने अभिवादन केले आणि लवकरच एम त्यांच्याशी मोकळेपणाने बोलू लागली, ते तिचं बोलणं मोठ्या आवडीने ऐकत होते. खरंतर ती फक्त १९ वर्षाची मुलगी होती. तिने त्यांना सांगितले की तिचे कवितेचे पुस्तक छापलं आहे.

“मला ते वाचायला आवडेल,” ते म्हणाले.

एमाने आपल्या पुस्तकाची एक प्रति मिस्टर एमर्सनला पाठवली. दोन आठवड्यानंतर तिला त्याचे उत्तर मिळाले.

प्रिय मिस लज़ारस,

मिस्टर वार्डच्या घरी आपल्या झालेल्या गप्पांची आठवण माझ्यासाठी सुखद आहेत. तुझे पुस्तक आणि पत्र वाचून तुझ्याबाबत झालेल्या माझ्या धारणा अधिक पक्क्या झाल्या आहेत.




एमा प्रसन्न झाली. मिस्टर एमर्सनला तिच्या कविता चांगल्या वाटल्या. की ही फक्त त्यांची उदारता होती?

 त्यांनी एकही आलोचनात्मक गोष्ट सांगितली नाही. एमाला वाटत होते की त्यांनी आपले स्पष्ट मत द्यावे आणि तिच्या कवितांमधील कमतरता तिला सांगाव्यात. तिने पत्रात लिहले.

 मला खूप प्रसन्न वाटले असते जर तुम्ही माझ्या काही कवितांव र खुणा केल्या असत्या, ज्या तुम्हांला आवडल्या नाहीत. कारण मी माझ्या कवितेत सुधारणा करू इच्छिते... जितकं माझ्यासाठी करणं शक्य आहे.

 ती परत प्रतिक्षा करू लागली. मिस्टर एमर्सन तिला शिकवू शकतील का? त्यांच्या पुढच्या पत्रात तिला तेच उत्तर मिळाले ज्याची तिला प्रतिक्षा केली होती.

मला तुझे अध्यापक व्हायला आवडेल. तुला सर्व सत्रात उपस्थित राहावे लागेल. खूप पुस्तके वाचावी लागतील आणि खूप लिहावं लागेल.



एमाच्या आनंदाला सीमा राहिली नाही.

जितकी पुस्तकें मिस्टर एमर्सनने तिला वाचायला सांगितली ती सगळी तिने वाचली. त्यांच्या सूचना लक्षात ठेवून समजून घेवून ती आपल्या रचना परत परत लिहू लागली. आणि शब्दांमध्ये काटछाट करू लागली. एक कविता अजून एका मासिकात प्रकाशित झाली आणि मग दुसरी अजून एका मासिकात. तिचे एक पुस्तक प्रकाशित झाले आणि मग तिसरे.. मिस्टर एमर्सनची युवा लेखिका मोठी झाली होती आणि प्रसिद्धी मिळवत होती.

कविताबरोबरच एमाने लेख लिहले. पुस्तकांची समीक्षा सुद्धा केली. ती म्युझियममध्ये आयोजित कार्यक्रमांत जात असे. नाटक बघे, संगीत समारंभांना जाई. एका मित्राला तिने पत्रात लिहले, “मला माहित नाही कधी माझ्यात लोक, पुस्तके, कला, संगीत याबद्दल एवढी रुची निर्माण झाली... प्रत्येक गोष्ट जिचा आनंद घेऊ शकतो.”

देशातल्या सगळ्यात लोकप्रिय मासिकामध्ये सेंचुरी मध्ये तिच्या कविता सतत प्रकाशित होऊ लागल्या. त्या मासिकाचे संपादक आणि त्यांची पत्नी तिचे सगळ्यात प्रिय मित्र होते. त्यांनी तिची भेट एक राजनेता, विलियम एवर्ट्स, बरोबर घालून दिली. ज्यांनी तिला एका विरोध सभेत येण्याचे आमंत्रण दिले. या विरोध सभेने एमाचे जीवनच बदलून टाकले. आता तिच्या कवितांना एक नवीन उद्देश दिसू लागला.







एका संध्याकाळी एमाने एका हॉलमध्ये प्रवेश केला. तिथं खूप लोक होते आणि सगळे वेगवेगळ्या भाषा बोलत होते. वातावरणात तणाव होता.


विलियम एवर्ट्स स्टेजवर आले. त्यांनी घोषणा केली की रुस मध्ये यहुदीच्या बरोबर भयंकर हिंसा झाली आहे. त्यांनी सांगितलं की या सामुहिक हत्याकांडात अनेक शहरांमध्ये यहुदी पुरुष, महिला आणि मुलांना मारून टाकले. त्यांची घरं जाळून टाकली. आणि त्यांची संपत्ती लुटली. हे ऐकून एमाला खूप धक्का बसला. ती हे समजून चुकली की यहुदीची हिंसा आणि त्यांच्या प्रती घृणा होऊन युग उलटले. आता तिला असं वाटलं की आपल्या लोकांचे रक्षण करण्यासाठी उभं राहिला पाहिजे..


या हत्याकांडाच्या विरोधात तिने वर्तमानपत्रात लिहायला लागली.





मग या हिंसेचे शिकार झालेल्या लोकांना ती भेटायला गेली. रुसचे हे यहूदी शरण येण्यासाठी न्यूयॉर्कला येत होते. तिने शेकडो भुकेल्या आणि भयभीत शरणार्थी लोकांना पहिले, जे वार्ड द्वीप मध्ये ठसाठस भरले होते. तिथं पिण्याचे पाणी नव्हते. त्यांना कच्ची पोळी आणि किड्यांनी भरलेले सूप दिलं जात असे. मुलं चिखलात खेळत होती. राग येऊन एमाने ही भयानक स्थिती जगासमोर येण्यासाठी वर्तमानपत्रात लेख लिहले.






त्या लोकांसाठी ती खाणं आणि कपडे घेऊन आली. इंग्लिश शिकवण्यासाठी तिने वर्ग चालवले. शरणार्थीना मदत करण्यासाठी लोकांना प्रेरित केलं. सरकारी अधिकाऱ्यांना भेटली. शरणार्थीना काही कौशल्य शिकवण्यासाठी शाळा उघडल्या.


पण सगळ्या लोकांनी शरणार्थींचे स्वागत केले नाही. काही लोक वाढणारे गुन्हे, आजार यासाठी त्यांना दोषी मानत होते, शरणार्थींना रोखण्यासाठी कायदा करण्याची मागणी लोकांनी केली. लोकांचे विचार बदलण्यासाठी एमाने खूप प्रयत्न केले.

आता तिची लेखणी अन्यायाच्या विरोधात रोष, आपल्या परंपरा आणि संस्कृती बाबत गर्व आणि नवीन समाजात आशा निर्माण करत होती. मोठ्या वेगाने ती नवीन कविता,नाटक आणि लेख लिहित होती.

“ जो पर्यंत सगळे स्वतंत्र नाहीत, कोणीही स्वतंत्र नाही.”








एमाने ठरवलं की ती इंग्लडला जाऊन तेथील यहुदी नेत्यांना भेटून यहुदींच्या स्थिती विषयी चर्चा करून येईल. लहानपणापासून तिने इंग्लड, फ्रान्स आणि इटली या जागा बघण्याचे स्वप्न पहिले होते. ज्या बाबतीत तिने पुस्तकात वाचलं होतं. आपली बहीण जोसफिन बरोबर ती युरोप प्रवासाला निघाली. दोघी इंग्लड आणि इटलीमधल्या अनेक जागांवर फिरल्या. ज्या लोकांना भेटली आणि ज्या जागा बघितल्या त्याबद्दल तिने पत्राद्वारे आपल्या घरच्यांना कळवले.

परत येतांना एमाचे जहाज़ न्यूयॉर्क बंदरावर आले. ती त्याच रस्त्याने परत येत होती, ज्या रस्त्याने यहूदी शरणार्थी आपलं सगळं सामान घेऊन आले होते. त्यांचे भविष्य अनिश्चित होते आणि त्यांना आपल्या नव्या देशाची भाषा पण येत नव्हती. ती किती भाग्यवान होती की तिचं स्वागत करण्यासाठी नातेवाईक आणि मित्र आले होते. ज्यांना ती आपल्या विदेश यात्रेचे रोचक अनुभव सांगायला आतुर होती. तिला वाटलं की हे महत्वपूर्ण आहे, तिचा देश समानतेचा आदर्श मानत, त्रास दिलेल्या लोकांना आधार देत आहे.





पत्रांचा गठ्ठा एमाची वाट बघत होता. एक पत्र मिस्टर एवर्ट्स यांचे होते. त्यांनी लिहलं होतं की फ्रान्सच्या विशाल मूर्तीचे नाव लिबर्टी होते, ती यूनाइटेड स्टेट्सला पाठवली होती. पण ही मूर्ती बसवण्यासाठी पेडस्टलची गरज होती. त्यासाठी एक पेडस्टल फंड कमेटी तयार केली गेली. पैसे गोळा करण्यासाठी कमिटी लिलाव करणार होती. तू या मूर्तीवर एखादी कविता लिहून दान करू शकशील का?


“मला खंत वाटते की मी याप्रकारचे काही लिहू शकत नाही,” तिने उत्तर दिले. “कविता हृदयातून यायला हवी.”

एवर्ट्स निराश झाले नाही. त्यांनी कमेटीचे एक सदस्य, कॉन्स्टेंस कैरी हैरिसन, यांना तिच्याकडे पाठवलं. हैरिसनने एमाला विनंती केली.

एमा म्हणाली, “अशी लिहलेली कविता निर्जीव होईल.”

हैरिसन यांनी ज़ोर दिला, “विचार कर ही मूर्ती त्याच बंदरात पेडस्टलवर उभी राहून आपल्या मशालीने तुझ्या रूसी शरणार्थींना प्रकाश दाखवत आहे.”

एमाने उसासा टाकत म्हटले, “लिलाव पुढच्या आठवड्यात आहे, मी इच्छा असूनही एवढ्या लवकर कविता लिहू शकत नाही.”





पण हैरिसनच्या गप्पांनी ती उत्तेजित झाली. तिने कल्पना केली की शरणार्थी न्यूयॉर्क बंदरावर प्रथमच उतरत आहेत आणि त्यांची दृष्टी त्या मूर्तीवर पडली, जिचे नाव लिबर्टी आहे. वर्तमानपत्रांनी त्या मूर्तीची तुलना प्रसिद्ध यूनानी मूर्ती, कॉलॉससशी केली होती, जो एक पुरुष होता, शत्रुओं को भयभीत करने वाली, मूर्ति थी. लिबर्टी भी विशाल और शक्तिशाली होता, पण कॉलॉसस पेक्षा हि मूर्ती मशाल घेवून त्या लोकांचा मार्ग प्रकाशित करतांना दिसत होती, जे प्रथमच येत होते.

एमा लिहायला बसली. शब्द उमलू लागले. तिने शीर्षक लिहले, ‘नवा कॉलॉसस’

मग ती आपल्या अंतर्मनाचा आवाज ऐकू लागली. शब्द उमलू लागले, आकार मनाच्या पटलावर दिसू लागले.

तिने लिहलं:

त्या विशाल यूनानी देवाच्या समान नाही

धरतीला जिंकण्यासाठी पसरले आहेत ज्याचे बाहू

आमच्या या समुद्री तटावर उभी आहे

शक्तिशाली महिला पकडून हातात एक मशाल

ज्यात बंदिस्त आहेत विजा, जिचे नाव

एमा थांबली, तिच्यासाठी कोणतं नाव योग्य होईल?



एमाने त्या शरणार्थींच्या बाबत विचार केला, ज्यांना ती वार्ड द्वीप वर भेटली होती. त्यांनी किती कष्ट आणि दुःख झेलले होते. त्यांना आश्रय आणि सांत्वनाची गरज होती. जर मूर्तीचे नाव पाहिजे असेल तर ते नाव असेल .....

निर्वासितांची आई. तिची मशाल करते

मार्ग प्रकाशित तिचे कोमल डोळे बघत आहेत

दोन नगरांना जोडणारे बंदर


जर हि मूर्ती जगाला काही सांगत असेल तर काय सांगेल? एमाने आपल्या मनाचे ऐकले. तिने लिहले:

“प्राचीन देश आपल्या वैभवशाली लोकांना त ठेवेल आपल्याजवळ“ तिचे मूक ओठ म्हणत आहेत, “मला द्या तुमचे गरीब असाह्य, जे तडपत आहेत स्वातंत्र्या साठी

तुमच्या धरतीवर जे आहेत व्यर्थ आणि निर्बल ,बेघर लोकांना पाठवा माझ्याकडे

या सोनेरी गेटवर मी करत आहे प्रतीक्षा घेऊन हातात ही मशाल.”

एमाने आपली लेखणी ठेवली. तिने कविता लिहली. शरणार्थींसाठी तिच्या मनात ज्या आशा आणि स्वप्नं होती ती तिने त्या कवितेत लिहल्या होत्या. कदाचित याने कोणाचे कल्याण होईल.



३ डिसेंबर १८८३ला जो लिलाव झाला त्यात फक्त एकच कविता वाचली गेली आणि ती होती नवा कॉलॉसस. कवी जेम्स रुस्सेल लोवेलने एमाला लिहले, “ मला तुझी कविता आवडली. मूर्ती पेक्षा अधिक तुझी कविता चांगली आहे...तुझ्या कवितेने तिला एक उद्देश दिला, कारण पेडस्टल सारखे यालाही उद्देशाची आवश्यकता होती..”

एमाला या कवितेचे महत्व कधी वाटले नाही. १८८७ मध्ये तिचा मृत्यू झाला. १९०३ मध्ये ही कविता एका फलकावर लिहून मूर्तीच्या पेडस्टलवर लावला गेला.

काळ गेल्यानंतर मूर्ती आणि कवितेचा सबंध कायमचा झाला. मूर्ती आताही शरणार्थींना आशेचा प्रकाश दाखवत आहे.

एमाच्या मृत्यूनंतर जगभरच्या लोकांनी शोक संदेश पाठवले होते.